# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्तविभाग
# राष्ट्रीय बातमीपत्र
# सकाळी 08 वाजून 30 मिनिटं

**दिनांक:26.11.2025** **वार:बुधवार**

---

1. संविधान दिनानमित्त देशभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन
2. हैदराबाद इथल्या विमान इंजिन देखभाल दुरुस्ती सुविधेचं आज उद्घाटन
3. पंतप्रधानांच्या हस्ते अयोध्येत राम मंदिरावर धर्म ध्वजारोहण
4. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंती वर्षानिमित्त राष्ट्रीय स्तरावरील पदयात्रेचा आज प्रारंभ आणि
5. टी-20 विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धा पुढच्यावर्षी 7 फेब्रुवारी पासून

**संविधान दिवस**

देशभरात आज संविधान दिवस साजरा केला जाणार आहे. हमारा संविधान हमारा स्वाभिमान ही यंदाच्या संविधान दिवसाची संकल्पना आहे. नवी दिल्लीत संविधान सदनाच्या मध्यवर्ती सभागृहात होणाऱ्या मुख्य सोहोळ्यात राष्ट्रपती, उपराष्ट्रपती, पंतप्रधान आणि संसदेतील खासदार सहभागी होतील.संविधान दिवसानिमित्त आज देशभरातल्या अनेक शहरांमध्ये, गावांमध्ये संविधानाच्या प्रस्तावनेचं वाचन केलं जाणार आहे. या कार्यक्रमात राज्यघटनेच्या मराठीसह 9 भाषांमधल्या अनुवादाचं प्रकाशन केलं जाणार आहे.

**पंतप्रधान**

हैदराबाद इथल्या सॅफरान विमान इंजिन देखभाल दुरुस्ती सुविधेचं उद्घाटन आज पंतप्रधान नरेंद्र मोदी दूरदृश्य प्रणालीद्वारे करणार आहेत. हैदराबादमधल्या जीएमआर एअरोस्पेस अँड इंडस्ट्रीयल पार्क इथं उभारलेली ही सुविधा हवाई वाहतूक क्षेत्रातील आत्मनिर्भरतेच्या दिशेनं महत्त्वाचं पाऊल मानलं जात आहे. यामुळे परकीय चलनावरील खर्च कमी होईल, रोजगार निर्मिती होईल, पुरवठा साखळी मजबूत होईल आणि जागतिक हवाई वाहतूक क्षेत्रात भारताचं स्थान भक्कम होईल.

**पंतप्रधान-अयोध्या**

उत्तर प्रदेशमध्ये अयोध्येतील श्री राम जन्मभूमी मंदिराच्या शिखरावर काल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते धर्म ध्वजारोहण झालं. हे ध्वजारोहण मंदिर निर्माणाचं काम पूर्ण झाल्याचं आणि राष्ट्रीय एकतेचं तसंच नव्या सांस्कृतिक पर्वाचं प्रतीक आहे. हा ध्वज भारतीय संस्कृतीच्या पुनरुत्थानाचं प्रतिनिधित्व करत आहे. अंतिम विजय सत्याचाच होतो हेच हा पवित्र ध्वज दाखवून देत असल्याचं पंतप्रधान म्हणाले. उत्तर प्रदेशच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल, मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक मोहन भागवत कार्यक्रमाला उपस्थित होते. जय श्री रामच्या जयघोषात, शंखध्वनीच्या निनादात आणि अभिजीत मुहूर्तावर संपन्न झालेल्या या ध्वजारोहण सोहोळ्याला जगभरातून हजारो राम भक्त उपस्थित राहिले होते.

**26/11**

26/11 च्या मुंबई दहशतवादी हल्ल्यातील हुतात्म्यांच्या स्मरणार्थ राष्ट्रीय सुरक्षा दल अर्थात एनएसजीतर्फे आज गेट वे ऑफ इंडिया इथं एक कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अशा प्रकारचे हल्ले पुन्हा होऊ नयेत यासाठी एकत्रित प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी केला जाणार आहे. मुंबईतल्या 11 महाविद्यालयं आणि 26 शाळांमधले विद्यार्थी या शपथ ग्रहण कार्यक्रमात सहभागी होणार आहेत. कधीही नाही या संकल्पनेअंतर्गत युवकांमध्ये शांतता, सतर्कता आणि राष्ट्रीय सुरक्षा या मूल्यांच्या दृढीकरणासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे.

**पदयात्रा**

केंद्रिय क्रीडा आणि युवा व्यवहार मंत्रालयानं सरदार वल्लभभाई पटेल यांच्या दीडशेव्या जयंती वर्षानिमित्त राष्ट्रीय स्तरावर पदयात्रा आयोजित केली आहे. सरदार पटेलांचं मूळ गांव असलेल्या करमसाड गावातून आज या पदयात्रेचा प्रारंभ होणार असून ६ डिसेंबर रोजी स्टॅच्यू ऑफ युनिटी इथं सांगता होणार आहे. स्वच्छता, स्वदेशी आणि आत्मनिर्भरतेचा संदेश या दीडशे किलोमीटरच्या पदयात्रेतून दिला जाणार असल्याचं केंद्रिय क्रीडा आणि युवा व्यवहार मंत्री डॉ. मनसुख मांडवीय यांनी काल पत्रकार परिषदेत सांगितलं.

**भारत-रशिया**

रशियाच्या नेतृत्वातील युरेशियन इकॉनॉमिक युनियनसोबतच्या मुक्त व्यापार कराराबाबतच्या चर्चेला आज औपचारिक सुरुवात होणार आहे. केंद्रिय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पीयूष गोयल यांनी काल ही माहिती दिली. रशियासह अर्मेनिया, बेलारुस, कझाकस्तान आणि किर्गिझस्तान या देशांचा यामध्ये समावेश आहे. गेल्या 20 ऑगस्ट रोजी निश्चित केलेल्या शर्तींच्या अनुषंगानं ही चर्चा केली जाणार आहे. भारतीय उद्योग, शेतकरी आणि मत्स्य व्यावसायिक यांना नवी बाजारपेठ मिळवून देण्याचा या कराराचा उद्देश आहे. भारत इतर काही देशांसोबतच्या व्यापार कराराची शक्यता पडताळून पहात असल्याचं गोयल यांनी सांगितलं.

**गोपालरत्न पुरस्कार**

केंद्रिय पशुपालन, दुग्धव्यवसाय आणि मत्स्य व्यवसाय मंत्री राजीव रंजन सिंग यांच्या हस्ते आज नवी दिल्लीत राष्ट्रीय गोपाल रत्न पुरस्कारांचं वितरण होणार आहे. राष्ट्रीय दूध दिनानिमित्त आयोजित केलेल्या या कार्यक्रमात पशुधन आणि दुग्ध व्यवसाय क्षेत्राच्या बळकटीकरणासाठी अनेक उपक्रम सुरू केले जातील. दूध आणि दुग्धजन्य पदार्थांची पुरवठा साखळी सुधारण्यासाठी पायाभूत सुविधा भक्कम करणे आणि शेतकरी तसंच ग्राहक दोघांचाही फायदा होईल अशी माल साठवण आणि सेवा सुविधा निर्माण करणे हा या उपक्रमांचा उद्देश आहे.

**पीयूष गोयल**

गेल्या तीन महिन्यांत भारतातून युरोपिय महासंघाला होणाऱ्या मत्स्यवर्गीय सागरी अन्नपदार्थांच्या निर्यातीत झपाट्याने वाढ झाली असल्याचं केंद्रीय वाणिज्य आणि उद्योग मंत्री पियुष गोयल यांनी म्हटलं आहे. व्यापार मंडळाच्या बैठकीचं अध्यक्षपद भूषवल्यानंतर नवी दिल्ली इथं ते काल पत्रकारांशी बोलत होते. या वर्षी सप्टेंबरमध्ये युरोपीय महासंघानं 102 सागरी आस्थापनांना मान्यता दिल्यानंतर ही वाढ झाली आहे. एकंदर व्यापारातही गेल्या वर्षीपेक्षा वाढ दिसून येत असून जगभरात आव्हानात्मक परिस्थिती असूनही भारत एक तेजस्वी राष्ट्र म्हणून वाटचाल करत आहे, असं गोयल म्हणाले.

**परराष्ट्र मंत्रालय-चीन**

अरुणाचल प्रदेश हा भारताचा अविभाज्य भाग असून चीनचा नकार हे सत्य बदलू शकत नाही असं केंद्र सरकारनं म्हटलं आहे. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्यांच्या वक्तव्यांबाबत माध्यमांनी विचारलेल्या प्रश्नांना उत्तर देताना, परराष्ट्र मंत्रालयाचे प्रवक्ते रणधीर जयस्वाल यांनी हे ठाम प्रतिपादन केलं. अरुणाचल प्रदेशमधल्या एका महिलेला चौकशीसाठी ताब्यात घेतल्याच्या मुद्द्यावर चीनकडे तीव्र निषेध नोंदवल्याचं त्यांनी सांगितलं. चीनच्या अधिकाऱ्यांची ही कृती त्यांच्याच नियमावलीचं उल्लंघन असल्याचं जयस्वाल म्हणाले.

**रशिया उपग्रह**

रशियानं काल अनेक लष्करी उपग्रहांचं यशस्वी प्रक्षेपण केलं. नेमके किती उपग्रह प्रक्षेपित केले आणि त्यांचे स्वरुप काय याची माहिती रशियाच्या संरक्षण मंत्रालयानं गोपनीय राखली आहे. संरक्षण मंत्रालयासाठी तिथल्या एअरोस्पेस फोर्सेसच्या युध्दपथकानं हे अभियान राबवल्याचं कारण रशियानं यासाठी दिलं आहे.

**<u>ज्वालामुखी</u>**

इथिओपिया इथल्या ज्वालामुखी उद्रेकामुळे कालही 7 आंतरराष्ट्रीय विमानांचं उड्डाण रद्द करावं लागलं. या ज्वालामुखीतून निघणाऱ्या राखयुक्त धुराच्या लोटांचा या भागातून जाणाऱ्या विमानांवर परिणाम झाल्याचं तपासणीत दिसून आल्यामुळे विमान उड्डाणं रद्द केल्याचं एअर इंडियानं सांगितलं. हे राखेचे ढग भारतापासून दूर, चीनच्या दिशेनं वळाल्याची माहिती भारतीय हवामान विभागानं काल दिली.

**<u>बांग्लादेश आवामी लीग</u>**

बांग्लादेशात पदावरुन दूर व्हावे लागलेल्या पंतप्रधान शेख हसीना यांच्या अवामी लीग पक्षानं 30 नोव्हेंबरपर्यंत देशव्यापी निदर्शनं करण्याची घोषणा केली आहे. शेख हसीना यांना सुनावलेल्या फाशीच्या शिक्षेच्या विरोधात निषेध मोर्चे काढणार असल्याचं पक्षानं जाहीर केलं. शेख हसीना आणि अवामी लीग पक्षाला आगामी निवडणुकांपासून दूर ठेवण्यासाठी महंमद युनुस यांच्या अंतरिम सरकारनं राजकीय हेतूनं फाशीची शिक्षा सुनावल्याचा आरोप पक्षानं केला आहे.

**<u>मुश्ताक अली करंडक</u>**

20 षटकांच्या सामन्यांची सय्यद मुश्ताक अली करंडक देशांतर्गत क्रिकेट स्पर्धा आजपासून पुण्यात सुरू होत आहे. पुण्यातील डेक्कन जिमखाना मैदानावर सकाळी 9 वाजता मिझोराम आणि नागालँड यांच्यात उद्घाटनाचा सामना खेळला जाईल. स्पर्धेत 38 संघ सहभागी होत आहेत. स्पर्धेतला अंतिम फेरीचा सामना 18 डिसेंबर रोजी इंदूर इथं खेळला जाणार आहे. तीन जेतेपदांसह तमिळनाडू हा स्पर्धेच्या इतिहासातील सर्वात यशस्वी संघ आहे.

**<u>क्रिकेट</u>**

भारत आणि दक्षिण अफ्रिका यांच्यातल्या दुसऱ्या कसोटी क्रिकेट सामन्याच्या चौथ्या दिवशी भारतानं दोन गडी बाद 27 धावा केल्या. कालचा खेळ संपला तेव्हा साई सुदर्शन 2 तर कुलदीप यादव 4 धावांवर खेळत होते. तत्पूर्वी दक्षिण अफ्रिकेनं आपला दुसरा डाव 260 धावांवर घोषित केला आणि भारतासमोर विजयासाठी 549 धावांचं मोठं लक्ष्य ठेवलं.

**<u>विश्वकरंडक</u>**

टी-20 विश्वकरंडक क्रिकेट स्पर्धा 7 फेब्रुवारी 2026 पासून सुरू होणार आहे. भारत आणि श्रीलंका या स्पर्धेचे सह यजमान आहेत. आंतरराष्ट्रीय क्रिकेट परिषदेनं काल या स्पर्धेतले गट आणि स्पर्धेचं वेळापत्रक जाहीर केलं. भारत आणि पाकिस्तान यांच्यातील क्रिकेट सामना 15 फेब्रुवारी रोजी कोलंबो इथं खेळला जाईल. पाकिस्तानचे सर्व सामने श्रीलंकेत होणार आहेत. या स्पर्धेत वीस संघ सहभागी होणार असून त्यांची पाच संघांच्या चार गटांमध्ये विभागणी करण्यात आली आहे. अ गटात भारतासह पाकिस्तान, नेदरलँड्स, नामिबिया आणि अमेरिका यांना स्थान देण्यात आलं आहे.

# याबरोबरच हे राष्ट्रीय बातमीपत्र संपलं.

# नमस्कार.